# कंदिलाचे फायदे

समईची किंवा मेणबत्तीची ज्योत वाऱ्यामुळे सारखी फडफडते आणि विझते. कंदिलाच्या वातीभोवती काचेची हंडी असते. हंडीमुळे ज्योतीला वारा लागत नाही. ती न फडफडता जळते व आपल्याला चांगला उजेड मिळतो.

काचेमुळे कंदिलाची ज्योत वारा लागून विझत नाही.
एकदा कंदील पेटवून ठेवला की त्याच्याकडे बराच वेळ
पहावे लागत नाही.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई ४००००५.
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
(विद्याभारती) पुणे ४११०२९.



कंदिलाचा आणखी फायदा
कोणता बरे ?

समई, पणती, चिमणी हे दिवे
फार वेळ जळत नाहीत.
त्यात पुन्हा पुन्हा तेल भरावे
लागते.

कंदिलाची टाकी मोठी असते.
तिच्यात बरेच तेल भरता येते.
त्यामुळे कंदील
बराच वेळ जळतो.



चिमणीलासुध्दा काच बसवतात.
म्हणून समई किंवा मेणबत्तीपेक्षा
चिमणी चांगली.





समईची किंवा चिमणीची वात
फारच अरुंद असते. त्यामुळे
तिची ज्योत लहान होते. तिचा
उजेडही कमी पडतो.

कंदिलाची वात रुंद असते. त्यामुळे कंदिलाची
ज्योत खूप मोठी होते व उजेडही
भरपूर मिळतो.



कंदिलाचा आपल्याला फार
उपयोग होतो.
कंदील नीट काळजी घेऊन वापरला
तर पुष्कळ दिवस टिकतो.

कंदिलाची काळजी कशी घ्यावी ?

कंदील कसा वापरावा?